# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 167/2024 दिनांक : 11.05.2024

## 1)खुन :–

**बारड :–**दिनांक 27.04.2024 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास, **मौ. देगाव शिवार ईसापुर धरणाकडुन येणाऱ्या पाण्याच्या कॅनॉलमध्ये ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे गिताराम ऊर्फ शाम ज्ञानोबा चाटे, वय 32 वर्षे, रा. मालीपार्गाव ता. माजलगाव जि. बिड,** हा दानिशखान यांचे डाकीन कंपणी (ए जी कंस्ट्रक्शन)द्वारे चालणारे मौ. देगाव ता. अर्धापुर गावचे परिसरात इसापुर धरणाकडुन येणाऱ्या पाण्याचा कॅनॉल मायनर 20 चे दुरूस्तीचे ठिकाणी कामकाज करीत अतसांना यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून कामावरील पीवळया पोकलॅण्ड ईसी–136 एलएनटी 120 एमए 75 यु वरील बिहारचा चालकानी विनाकारण मयता सोबत वाद घालुन शिवीगाळ करून पोकलॅण्ड जेसीबीच्या भुमबकीटाने त्याचे पोटावर, कमरेवर, गुप्तांगावर मारून खुन केला. फिर्यादीने त्याचे भावाचे प्रेतावर अंत्यसंस्कार करून तसेच धार्मिक विधी पार पाडुन आज रोजी पोस्टे बारड येथे तक्रार दिलेवरून गुन्हा दाखल. वगैरे **फिर्यादी सिद्वेश्वर ज्ञानोबा चाटे, वय 36 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मालीपार्गाव ता. माजलगाव जि. बिड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरन 33/2024 कलम 302, 504, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री केदासे, मो.नं. 8483026950** हे करीत आहेत.

## 2)खुनाचा प्रयत्न :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 08.05.2024 रोजी रात्री 09.00 वा. चे सुमारास, **बौध्द विहाराजवळ जयभीमनगर नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचा मुलगा नामे निहाल पाईकराव यास जुण्या भांडणाचे कारणावरून खंजर व लोखंडी रॉडने डोक्यात, पाठीवर, हातापायावर, मांडीवर मारून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला. आमच्या गल्लीत दिसलास तर तुझ्या मुलाला व तुमच्या सर्व खानदानीला खतम करतो अशी धमकी देवुन शिवीगाळ करत निघुन गेले. त्यानंतर जखमी आवस्थेत फिर्यादीने तिचे मुलास उपचारकामी सरकारी दवाखाना व नंतर खाजगी दवाखान्यात शरीक केले. वगैरे **फिर्यादी सौ. रूक्मीनी भ्र. विनायक पाईकराव, वय 38 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. जयभिमनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 162/2024 कलम 307, 504, 506, 141, 143, 147, 148, 149 भादवी सह कलम 4/25, भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जाधव, मो.क्रं. 9158191257** हे करीत आहेत.

## 3)मोबाईल चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 09.05.2024 रोजी चे 21.00 वा. चे सुमारास, **कॅनल रोड चौक तरोडा नाका जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे भाजीपाला घेत असतांना गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादीचा रेडमी 9 प्राईम कपंणीचा किंमती 5000/–रू चा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सुशांत सिद्रमा नैनापल्ले, वय 19 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. राजसारथी नगर खंडोबा चौक नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 196/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2348 गंदमवाड, मो.क्रं. 9881796535** हे करीत आहेत.

## 4)चंदनाचे झाड चोरी :–

**लिंबगाव :–** दिनांक 10.05.2024 रोजी चे 14.15 वा. चे सुमारास, **मौ. सुगाव येथील कोटतिर्थ व थुगाव या गावाकडे जाणारे रोडवरील टी पॉईंट ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशिररीत्या शासनाने मनाई केलेले चंदनाचे झाड किंमती 2000/–रू चे व तोडण्यासाठी वापरलेली कुऱ्हाड, वाकस, कुदळ, मोळा व निशान दगड असे साहित्य एकुण किंमती 22,400/–रू चे चोरटी विक्री करण्याकरीता ताब्यात बाळगलेले मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/श्री गंगाधर पि. विठठलराव कदम, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 60/2024 कलम 379 भादवी सह कलम 41, 42 भारतीय वन अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2941 मोरे, मो.क्रं. 9657717259** हे करीत आहेत.

## 5)अवैध रेती चोरी :–

**कुंडलवाडी :–** दिनांक 10.05.2024 रोजी चे 03.00 वा. चे सुमारास, **नागणी ते खंडगाव जाणारे रोडवर अरविंद बळीराम शिंदे यांचे शेताजवळ ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिरीत्या आपले ताब्यातील ट्रक क्रमांक टीएस–16/युबी–6356 किंमती सहा लाख रूपयाचे मध्ये दोन ब्रास रेती किंमती 10,000/–रू असा एकुण किंमती 6,10,000/–रू माल चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री दिपक साहेबराव मस्के, ने. पोस्टे कुंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 49/2024 कलम 379 भादवी सह कलम 48(7),48(7),महाराष्ट्र जमीन महसुल कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1921 कदम, मो.क्रं. 8007753455** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 10.05.2024 रोजी चे 16.10 वा. चे सुमारास, **लालवाडी पुलाजवळ पिंपळाच्या झाडाखाली शिवाजीनगर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी कट्टा (अग्नीशस्त्र) किंमती 20,000/–रूपयाचे व एक इनफिनीक्स कंपणीचा मोबाईल किंमती 10,000/–रू चा असा एकुण 30,000/–रू चा मुद्येमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1926 गुंडेराव रघुनाथ करले, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 163/2024 कलम 3/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री तुरनर, मो.क्र. 9922028409** हे करीत आहेत.

## 7)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.05.2024 रोजी चे 06.10 वा. चे सुमारास, **वाजेगाव बायपास रोडवर टापरे चौकाजवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या आपले ताब्यातील वाहन ट्रक क्रमांक एमएच–35/के–5297 मध्ये गोवंश जातीचे बैल दाटीवाटी कोंबुन क्रुरपणे पायास बांधुन कतलीसाठी नेत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/173, मारोती जळबा माने, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 367/2024 कलम 11 महाराष्ट्र प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री गढवे, मो. नं. 9225787605** हे करीत आहेत.

## 8)फसवणुक :–

**भाग्यनगर :–** दिनांक 04.04.2024 रोजी चे 22.00 ते दिनांक 05.05.2024 चे 14.32 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहात्याघरी मोगरा अपार्टमेंट फरांदे पार्क रूम नंम नं 302 नांदेड येथे,** यातील व फिर्यादीची पत्नी असे घरी फेसबुक सर्च करत असतांना **कोटयाक सिक्युरीटीजची** जाहीरात बघण्यात आली, त्यामध्ये ज्यांना **ट्रेडींग पलॅटफॉर्म** बदल शिक्षण देण्याचे दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे तेथे **साईन ईन** केले होते. त्यानंतर कांही दिवसांनी ग्रुपवर **कोटयाक सिक्युरीटीज(501)** या व्हॉटसअपच्या ग्रुपमध्ये दिनांक 27.02.2024 रोजी समाविष्ट करण्यात आले. त्यानंतर व्हॉटअसप ग्रुपवर दररोज **ट्रेडींग स्टॉक** मार्कट बदल माहिती देण्यात येत होते. त्यानंतर ग्रुपवर ज्यांना **इंन्स्टुटयुशनल ट्रेडींग अकाउंट** उघडायचे आहे त्यांनी ग्रुपमधील **असीस्टंट** यांना कॉनटॅक्ट करण्यास सांगीतले व रजिस्ट्रेशन फॉर्म ग्रुपवर देण्यात आला. व दिनांक 04.04.2024 रोजी फिर्यादीने त्याचे पत्नीचे नावे **रजिस्ट्रेशन फॉर्म** भरून आरोपी नामे श्वेता नावाच्या महिला **असीस्टंटकडे** भरून जमा केला तेव्हापासुन ते दिनांक 05.05.2024 रोजी पर्यंत फिर्यादीचे अकाउंट वरून वेगवेगळे **अकाउंटवर इनव्हेसमेंट लोन इनव्हेसमेंट अमाउंट इंटरेस्ट** असे एकुण फिर्यादी कडुन रक्कम पुन्हा पुन्हा पाठविण्यास सांगुन एकुण 23,05,000/–रूपयाची फिर्यादीची ऑनलाईन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी प्रशांत सुरेश लिंगे, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. मोगरा अपार्टमेंट फरांदे पार्क रूम नं–302 नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं. 195/2024 कलम 420 भादवि सह कलम 66(ड) आयटीॲक्ट कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनी/श्री वाघ, मो.नं. 9324546300** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :–

**1)तामसा :–** दिनांक 10.05.2024 रोजी चे 14.50 वा. चे सुमारास, **मौ. येवली आरोपीचे घराचे लगत मोकळया जागेत ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद महिला आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2100/–रूपयाचे मालासह चोरटी विक्री करण्याचे उदेशाने मिळुन आली. वगैरे **फिर्यादी पोकॉ/676, प्रभाकर दत्तराव कवडे, ने. पोस्टे तामसा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 43/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री डुडूळे, मो.नं. 9022037761** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :-** दिनांक 10.05.2024 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **राजा ढाबा समोर पोखर्णी शिवार ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 2070/-रूपयाचे मालासह चोरटी विक्री करण्याचे उदेशाने मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1139, रितेश सुरेशराव टाक, ने. पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 59/2024 कलम 65(ई), 83 म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2941 मोरे, मो.नं. 9657717259** हे करीत आहेत.

**3)मांडवी :-** दिनांक 09.05.2024 रोजी चे 23.45 वा. चे सुमारास, **मांडवी ते नागपुर रोडवर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3010/-रूपयाचे मालासह चोरटी विक्री करण्याचे उदेशाने घेवुन जात होता. पोलीसांना पाहुन सदरचा माल फेकुन देवुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/975, हेमंत यशवंतराव कांबळे, ने. पोस्टे मांडवी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी** गुरनं 34/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोहेकॉ/श्रीमती कनाके, मो.नं. 8888822811** हे करीत आहेत.

## 10)पाण्यात बुडून मृत्यु :-

**माहुर :-**दिनांक 08.05.2024 रोजी चे दुपारी 02.00 वा. चे सुमारास, **साठवण तलाव शेख फरीद वजरा ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अतुल भिकु जाधव, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शेख फरीद वजरा ता. माहुर जि. नांदेड** हा साठवण तलावात पोहण्यासाठी जाऊन पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार भिकु मोतीराम जाधव, वय 54 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शेख फरीद वजरा ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **आ. मृ. 07/2024** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/764 जाधव, मो.नं. 7887687478** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड